# हुकुमनामा

## खंडाळा येथील मे. दिवाणी न्यायाधीश साहेब क. स्तर यांचे कोर्टात

रे. दि. मु. नंबर – ४७/२०२६
निशाणी नंबर – ९५

| | |
|---|---|
| **१. राजेंद्र विठ्ठल गाडेकर**<br>वय – ५६ वर्षे, धंदा – शेती<br>**२. अनिता राजेंद्र गाडेकर**<br>वय – ५० वर्षे, धंदा – गृहिणी<br>**३. विशाल राजेंद्र गाडेकर**<br>वय – २५ वर्षे, धंदा – गृहिणी<br>**४. ओंकार राजेंद्र गाडेकर**<br>वय – २७ वर्षे, धंदा – गृहिणी<br>वादी नंबर १ ते ४ सर्वजण,<br>रा. गाडेकर हाईटस, पंढरपुर फाटा,<br>शिरवळ, ता. खंडाळा, जि. सातारा | **वादी** |

विरुदध

| | |
|---|---|
| **१. पोपट किसन गाडेकर**<br>वय – ७५ वर्षे, धंदा – शेती<br>**२. द्वारकाबाई पोपट गाडेकर**<br>वय – ७० वर्षे, धंदा – गृहिणी<br>**३. मिलींद पोपट गाडेकर**<br>वय – ४५ वर्षे, धंदा – शेती<br>**४. लता मिलींद गाडेकर**<br>वय – ४० वर्षे, धंदा – गृहिणी<br>**५. राहुल पोपट गाडेकर**<br>वय – ४२ वर्षे, धंदा – शेती | **प्रतिवादी** |

**६. रुपाली राहुल गाडेकर**
वय – ३२ वर्षे, धंदा – गृहिणी
**७. वर्षा आण्णासाहेब पायगुडे**
वय – ४२ वर्षे, व्यवसाय – गृहिणी
रा. मु. पो. वाडे बोल्हाई, ता. हवेली,
जि. पुणे
**८. जाईबाई किसन गाडेकर**
वय – ८२ वर्षे, धंदा – गृहिणी
**९. लालासो किसन उर्फ कृष्णराव गाडेकर**
वय – ७० वर्षे, धंदा – शेती
**१०. लता लालासाहेब गाडेकर**
वय – ६५ वर्षे, धंदा – गृहिणी
**११. रणजीत लालासाहेब गाडेकर**
वय – ३५ वर्षे, धंदा – शेती
**१२. सोनाली रणजीत गाडेकर**
वय – ३२ वर्षे, धंदा – गृहिणी
**१३. ताराबाई विठ्ठल गाडेकर**
वय – ७८ वर्षे, धंदा – गृहिणी
**१४. संजय विठ्ठल गाडेकर**
वय – ५३ वर्षे, धंदा – शेती
**१५. शकुंतला संजय गाडेकर**
वय – ४८ वर्षे, धंदा – शेती
**१६. सौरभ संजय गाडेकर**
वय – २५ वर्षे, धंदा – शेती
**प्रतिवादी नंबर १ ते ६, ८ ते १५, सर्वजण,**
**रा. गाडेकर वस्ती, साबळेवाडी,**
**शिरसुफळ, ता. बारामती, जि. पुणे**

**प्रतिवादी**

दावा जाहीर ठराव आणी वाटपाकामी

दावा किंमत – १४०६/– विषयाची किंमत – १४०६/–

दावा दाखल ता. २७/३/२६ दावा फैल ता. २८/३/२६.

<u>सदरील वादी मे. कोर्टास नम्रतापुर्वक कळवितात ते खालीलप्रमाणे</u> :

१. मिळकतीचे वर्णन –

१अ). मौजे शिरवळ, ता. खंडाळा, जि. सातारा येथील शेतमिळतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

| अ. क्र. | गट नंबर | एकुण क्षेत्र हे.आर.चौ. मी. पो.ख. सहित | वाटपाचे क्षेत्र हे.आर.चौ.मी. पो.ख. सहित | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| १ | ३२६/१ | एकुण क्षेत्र ०९.३४.२५ पैकी | खाते क्रमांक ४३६६ वरील ०.०२.९०<br>खाते क्रमांक ४३७४ वरील ०.०६.००<br>याप्रमाणे एकुण क्षेत्र ०.०८.९० | ०.०४ |

२. मौजे साबळेवाडी, ता. बारामती, जि. पुणे येथील शेतमिळकतीचे गट नंबर यांचे वर्णन खालीलप्रमाणे :

| अ. क्र. | गट नंबर | एकुण क्षेत्र हे.आर.चौ.मी. पो.ख. सहित | वाटपाचे क्षेत्र हे.आर.चौ.मी. पो.ख. सहित | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| १ | १/३ | ४.३८.०० | ४.३८.०० (गटाचे संपुर्ण क्षेत्र) | १.३३ |
| २ | १४ | ४.२८.०० | ४.२८.०० (गटाचे संपुर्ण क्षेत्र) | १.७५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | १७३ | ३.६०.०० | खाते नंबर ३०१ वरील<br>ला.ला. – ०.७६.००<br>पो.ख. – ०.१४.००<br>याप्रमाणे समाईक क्षेत्रामधील हिस्सा | ०.२० |
| ४ | १७४ | ७.७९.०० | खाते नंबर – २२३ वरील<br>ला.ला. – ०.५१.००<br>पो. ख. – ०.१४.००<br>................................<br>खाते नंबर – ५४२ वरील<br>ला.ला. – ०.२५.५०<br>पो.ख. – ०.०७.००<br>.....................................<br>खाते नंबर – १४२३ वरील<br>ला.ला. – ०.२५.५०<br>पो.ख. – ०.०७.०० | ०.३३ |
| ५ | १७५ | ०.१९.०० | खाते नंबर – १५०० वरील<br>ला. ला. – ०.०३.००<br>पो. ख. – ०.००.००<br>................................<br>खाते नंबर – १५०२ वरील<br>ला.ला. – ०.०२.२५<br>पो. ख. – ०.००.०० | ०.०७ |
| ६ | १७८ | ०.३९.०० | ०.३९.०० (गटाचे संपुर्ण क्षेत्र) | ०.५० |
| ७ | १७९ | १.५०.०० | खाते नंबर – १५०० वरील<br>ला.ला. – ०.१९.५०<br>पो.ख. – ०.०५.०० | ०.०५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | ................................<br>खाते नंबर – १५०२ वरील<br>ला.ला. – ०.१४.५०<br>पो.ख. – ०.०४.५० | |
| ८ | १८९ | ०.३२.०० | ०.३२.०० (गटाचे संपुर्ण क्षेत्र) | ०.२५ |
| ९ | १९१ | ०.६३.०० | खाते नंबर – १५६ वरील<br>ला.ला. – ०.०९.००<br>पो.ख. – ०.०१.०<br>................................<br>खाते नंबर – १२९६ वरील<br>ला.ला. – ०.०४.५०<br>पो.ख. – ०.०१.००<br>................................<br>खाते नंबर – १६६९ वरील<br>ला.ला. – ०.०५.००<br>पो. ख. – ०.००.०० | ०.११ |
| १० | ३६८ | १.६१.०० | १.६१.०० (गटाचे संपुर्ण क्षेत्र) | २.०६ |
| ११ | ३८२ | ३.२२.०० | ३.२२.०० (गटाचे संपुर्ण क्षेत्र) | ०.९४ |

वरीलप्रमाणे वाद मिळकती या प्रस्तुत दाव्याचा वाद विषय आहेत.

३. वादी कथन करितात की, वाद मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या समाईक वहिवाटीच्या, अदयाप सरस निरस मानाने वाटप न झालेल्या अशा मिळकती आहेत. सदर मिळकतीचे वाटप होवुन मिळणेकामी वादी यांनी प्रस्तुतचा दावा या मे. कोर्टामध्ये दाखल केलेला आहे.

४. वादी कथन करीतात की, वादी आणी प्रतिवादी हे एकत्र कुटुंबातील सदस्य असुन वाद मिळकती या त्यांच्या वडीलोपर्जीत मालकी हक्काच्या आणी समाईक वहिवाटीच्या अशा आहेत. सदरहु मिळकती या आजमितीस कौटुंबिक व्यवस्थेचा भाग म्हणुन वहिवाटीस आहेत परंतु त्याचे सरस निरस मानाने अदयाप वाटप झाले नाही त्याकारणास्तव वाटप होवुन मिळणेकामी वादी यांनी प्रस्तुतचा दावा या मे. कोर्टात दाखल केलेला आहे. वादी आणी प्रतिवादी हे एकाच कुटुंबातील सदस्य असुन वादी आणी प्रतिवादी यांची कारणापुरती वंशवेल खालीलप्रमाणे नमुद केलेली आहे.

खाशाबा बाळु गाडेकर – मुळ पुरुष (मयत)

सखुबाई – पत्नी (मयत)

किसन (मयत)

जाईबाई – पत्नी

विठ्ठल (मयत)

ताराबाई – पत्नी

पोपट

द्वारकाबाई–पत्नी

लालासो

लता–पत्नी

राजेंद्र

अनिता –पत्नी

संजय

मिलींद राहुल वर्षा

रणजीत

विशाल ओंकार

शकुंतला – पत्नी

सौरभ

याप्रमाणे वादी आणी प्रतिवादी यांची कारणापुरती वंशवले दिली असे.

५. वादी कथन करितात की, वादमिळकत हि आजमितीस वादी व प्रतिवादी यांचेमध्ये समाईक असल्याचे कारणास्तव त्यांना वादमिळकत योग्य रितीने व शांततामय रितीने वहिवाट करता येत नाही. त्याकारणास्तव वादी व प्रतिवादी यांचेमध्ये वादमिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होणे आवश्यक आहे. वादी यांना त्यांचा वाद मिळकतीमधील हिस्सा हा समाईकामध्ये ठेवायचा नाही. सदरहु मिळकतीचे वाटप करुन घेण्याबाबत वादी यांनी प्रतिवादी यास अनेकवेळा विचारणा करुन देखील प्रतिवादी यांनी वादी यास वाटप करुन दिले नाही त्याकारणास्तव प्रस्तुतचा दावा वाटपाकामी या मे. कोर्टामध्ये दाखल करणे वादी यास भाग पडले आहे.

६. वादी कथन करीतात की, दाव्यामधील काही मिळकतीचे सातबारा सदरी वादी आणी प्रतिवादी वगळता इतर सहहिस्सेदार आहेत. त्यांचा आणी वादी व प्रतिवादी यांचा हिस्सा वेगवेगळा असुन त्यांचेमध्ये यापुर्वीच वाटप झालेले आहे. त्याकारणास्तव त्यांचे विरुदध वादी यांची कोणतीही मागणी नसल्यामुळे त्यांना या दाव्यामध्ये सामील केलेले नाही. त्यांचेमध्ये आणी वादी आणी प्रतिवादी यांचे पुर्वहक्कदार यांचेमध्ये यापुर्वीच वाटप झाले असुन त्यानुसार वेगवेगळया वहिवाटी आहेत.

७. **दाव्यास कारण** – वादी यांनी प्रतिवादी यास वादमिळकतीचे वाटप करुन घेण्याबाबत अनेकवेळा विचारणा केली परंतु प्रतिवादी यांनी वादमिळकतीचे वाटप करुन दिले नाही. त्याकारणास्तव वादी यांनी दिनांक १५ जानेवारी २०२५ रोजी प्रतिवादी यांस वाटपाचे बैठकीसाठी बोलविले असता प्रतिवादी उपस्थित राहिले नाहीत. त्यानंतर देखील वारंवार वाटप करुन देण्याकामी

विचारणा केली असता प्रतिवादी यांनी वाटप करुन दिले नाही. त्यासुमारास दाव्यास कारण घडले असुन ते नित्यनियमाने घडत आहे.

८. **दाव्याची अधिकारीता** – वादमिळकती या मौजे शिरवळ ता. खंडाळा, जि. सातारा आणी मौजे साबळेवाडी, ता. बारामती, जि. पुणे येथील असल्यामुळे सदरचा दावा या कोर्टात दाखल होण्यास पात्र आहे. त्याचप्रमाणे वादी देखील याच मे. कोर्टाचे स्थळसिमेत वास्तव्यास आहेत त्यामुळे सदरचा दावा चालविणेचा या मे. कोर्टास पुर्णपणे अधिकार आहे.

९. **दाव्याची आकारणी** – वादीने प्रस्तुतचा दावा हा वाटपाकामी आणी जाहीर ठरावाकामी दाखल केलेला आहे. जाहीर ठरावासाठी दाव्याची किंमत रु. १०००/– इतकी ठेवलेली आहे. वाटपाकामी दाव्याची आकारणी करताना वादमिळकतीची एकुण आकारणी हि ०८ रु. ०५ पै इतकी होत असुन त्याची २०० पट रक्कम रु. १६१०/– इतकी होत आहे. वाद मिळकतीमध्ये वादी यांचा एकत्रीत हिस्सा हा १/४ इतका असल्यामुळे रक्कम रु. ४०६ वर रु. २००/– चा कोर्ट फि स्टॅम्प दिलेला आहे. याप्रमाणे दाव्याची एकुण किंमत रु. १४०६/– इतकी ठेवली असुन विषयाची एकुण रु. १४०६ /– इतकी ठेवलेली आहे.

१०. **सबब वादीची विनंती की,**

१. वादीचा प्रस्तुतचा दावा मंजुर करण्यात यावा.

२. वाद मिळकतीमध्ये वादीचा १/४ हिस्सा अथवा कादयाने ठरणारा हिस्सा जाहीर होवुन मिळावा.

३. वादीच्या हिश्याचे सरस निरस मानाने वाटप होवुन सदरचा हिस्सा स्वतंत्र करुन त्याचा कब्जा देण्यात यावा.

४. मे. कोर्टाचा वाटपाचा हुकुमनामा सरस निरस मानाने वाटप होवुन मिळणेकामी मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविण्यात यावा.

५. मे. कोर्टाच्या हुकुमानुसार ग्रममहसुल अधिकारी यांना सातबारा सदरी नोंद घेण्याकामी आदेश पारीत करण्यात यावेत.

६. इतर योग्य ते न्यायाचे हुकुम वादीच्या लाभात करण्यात यावेत.

७. या दाव्याचा संपुर्ण खर्च देण्यात यावा.

८. जरुर तर दावा दुरुस्तीस परवानगी असावी.

येणेप्रमाणे फैसला होवुन मिळावा हि विनंती.

●.................................●.................................●.................................●

## आदेश

**आज दिनांक ०७ एपिल २०२६ रोजी, मा. दिवाणी न्यायाधीश साहेब क. स्तर, एस. जी. कुवळेकर, यांचेसमोर वादी व प्रतिवादी हजर. वादीतर्फे विधीज्ञ ॲड. एन. डी. पिसाळ व प्रतिवादीतर्फे विधीज्ञ ॲड. एम. एस. राऊत हजर. त्यांचेसमक्ष प्रस्तुतचे दाव्यामध्ये निशाणी** ७३ **खालील तडजोड पुर्सीस नुसार खालीलप्रमाणे हुकुम होत आहे.**

**<u>सदरकामी वादी आणी प्रतिवादी यांचेतर्फे संयुक्त तडजोड पुरशीस खालीलप्रमाणे</u>** :

१. प्रस्तुतचा दावा हा वादी यानी प्रतिवादी यांचे विरुदध वाटपाकामी दाखल केलेला होता. सदरच्या दाव्याची प्रतिवादी यांना माहिती झाल्यानंतर वादी

व प्रतिवादी यांनी एकत्र बसुन सदरचा दावा तडजोडीने निकाली काढण्याचे ठरविले व त्यानुसार तडजोडीने सरस निरस मानाने वाटप करुन घेतले आहे. झालेल्या वाटपानुसार वादी व प्रतिवादी आज रोजी वकीलांमार्फत हजर राहुन तडजोड पुरशीस दाखल करित आहेत. सदरहु तडजोडीनुसार वादी व प्रतिवादी यांनी खालीलप्रमाणे वाटप करुन घेतलेले आहे.

**१अ). मौजे शिरवळ, ता. खंडाळा, जि. सातारा येथील शेतमिळकतीचे वाटप खालीलप्रमाणे :**

| अ. क्र. | गट नंबर | एकुण क्षेत्र हे.आर.चौ.मी. पो.ख. सहित | वाटपाचे क्षेत्र हे.आर.चौ.मी. पो.ख. सहित | वाटपानुसार धारकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | ३२६/१ | एकुण क्षेत्र ०९.३४.२५ पैकी | खाते क्रमांक ४३६६ वरील ०.०२.९०<br>..................<br>खाते क्रमांक ४३७४ वरील ०.०६.०० | **राजेंद्र विठ्ठल गाडेकर**<br>..............................<br>**अनिता राजेंद्र गाडेकर** |

१ब). मौजे साबळेवाडी, ता. बारामती, जि. पुणे येथील शेतमिळकतीचे वाटप खालीलप्रमाणे :

| वाटपापुर्वी | | | | वाटपानुसार | |
|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | गट नंबर (स्थानिक नाव) | खाते नंबर | धारकाचे नाव | धारकाचे नाव | क्षेत्र ला. ला. पो. ख. |
| १ | १/३ (साबळेचा मळा) | ३८७<br><br>६३४ | शकुंतला संजय गाडेकर<br><br>अनिता राजेंद्र गाडेकर | अनिता राजेंद्र गाडेकर<br><br>.........................<br><br>ओंकार राजेंद्र गाडेकर<br>.........................<br>राजेंद्र विठ्ठल गाडेकर | १.५६.००<br>०.०४.००<br>.............<br>१.५७.००<br>०.०३.००<br>...........<br>१.१८.०० |
| २ | १४ (चौली) | ७४९<br>१४२३<br>१६६८<br>१६६९<br>१६७०<br>१९३६ | संजय विठ्ठल गाडेकर<br>लता लालासो गाडेकर<br>सौरभ संजय गाडेकर<br>मिलिंद पोपट गाडेकर<br>राहुल पोपट गाडेकर<br>लालासो किसन गाडेकर | संजय विठ्ठल गाडेकर<br><br>...........................<br>सौरभ संजय गाडेकर<br>...........................<br>शकुंतला संजय गाडेकर | १.३६.००<br>०.०१.००<br>...........<br>१.३१.००<br>...........<br>१.६०.०० |
| ३ | १७४ (बुवाची पट्टी) | २२३<br>५४२<br>१४२३ | द्वारकाबाई पोपट गाडेकर<br>लालासो किसन गाडेकर<br>लता लालासो गाडेकर | ताराबाई विठ्ठल गाडेकर | १.०२.००<br>०.२८.०० |
| ४ | १७५ (ढगा) | १५००<br><br>१५०२ | लालासाहेब किसन गाडेकर<br>पोपट किसन गाडेकर<br>ताराबाई विठ्ठल गाडेकर | ताराबाई विठ्ठल गाडेकर | ०.०५.२५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | १७८ (घरापुढची पट्टी) | १५६<br>३००<br>१९३६ | ताराबाई विठ्ठल गाडेकर<br>पोपट किसन गाडेकर<br>लालासो किसन गाडेकर | लता मिलींद गाडेकर | ०.३७.००<br>०.०२.०० |
| ६ | १७९ (वस्तीपड) | १५००<br><br>१५०२ | लालासाहेब किसन गाडेकर<br>पोपट किसन गाडेकर<br>ताराबाई विठ्ठल गाडेकर | लालासो किसन गाडेकर<br>..............................<br>द्वारकाबाई पोपट गाडेकर | ०.२०.५०<br>०.०५.००<br>............<br>०.१३.५०<br>०.०४.५० |
| ७ | १८९ (नारळाची पट्टी) | १५६<br>३००<br>१९३६ | ताराबाई विठ्ठल गाडेकर<br>पोपट किसन गाडेकर<br>लालासो किसन गाडेकर | लालासो किसन गाडेकर | ०.२८.००<br>०.०४.०० |
| ८ | १९१ (उंबराची पट्टी) | १५६<br>१२९६<br>१६६९ | ताराबाई विठ्ठल गाडेकर<br>लालासो किसन गाडेकर<br>मिलिंद पोपट गाडेकर | राहुल पोपट गाडेकर | ०.१८.५०<br>०.०२.०० |
| ९ | ३६८ (ताल) | १५६<br>१४२३<br>१६६९<br>१९३६ | ताराबाई विठ्ठल गाडेकर<br>लता लालासो गाडेकर<br>मिलिंद पोपट गाडेकर<br>लालासो किसन गाडेकर | मिलिंद पोपट गाडेकर<br>..............................<br>रणजीत लालासो गाडेकर | ०.७५.५०<br>०.०५.००<br>............<br>०.७५.५०<br>०.०५.०० |
| १० | ३८२ (अमराळा) | ३८७<br>१४२३<br>१६७०<br>१९३६ | शकुंतला संजय गाडेकर<br>लता लालासो गाडेकर<br>राहुल पोपट गाडेकर<br>लालासो किसन गाडेकर | राहुल पोपट गाडेकर<br>..............................<br>रुपाली राहुल गाडेकर<br>.............................. | ०.७७.००<br>०.०४.००<br>............<br>०.७६.५०<br>०.०३.५०<br>............ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | रणजीत लालासो गाडेकर<br>सोनाली रणजीत गाडेकर<br>समाईक | १.५३.५०<br>०.०७.५० |

वरीलप्रमाणे वादी आणी आणी प्रतिवादी यांनी शेतमिळकतीचे वाटप करुन घेतले असुन त्यानुसार ग्राममहसुल अधिकारी व मंडलाधिकारी यांचेकडे अर्ज देवुन नोंदी करुन घ्यायच्या आहेत.

२. दावा मिळकतीपैकी कलम १अ मधील मिळकत हि वादी यांची स्वकष्टार्जीत मिळकत आहे त्यामुळे सदरची मिळकत हि वादी यांचेच नावे ठेवलेली आहे.

३. दावा मिळकतीपैकी गट नंबर १७३ हि मिळकत समाईक ठेवलेली आहे. सदर मिळकतीचे सातबारा सदरी यापुर्वी असलेली पोपट किसन गाडेकर आणी संजय विठ्ठल गाडेकर यांचे नावाची नोंद कमी करुन त्या ठिकाणी लता लालासाो गाडेकर आणी लता मिलींद गाडेकर यांचे नावाची नोंद इतर सहहिस्सेदार यांचे समवेत समाईकामध्ये घेणेची आहे.

४. दावा मिळकतीचे सातबारा सदरी असलेले सहहिस्सेदार लालासो किसन गाडेकर यांचे नावाचा लालासो आणी लालासाहेब असा उल्लेख आलेला आहे. वाटप तक्त्यानुसार त्यांचे नावाची नोंद सातबारा सदरी लालासो किसन गाडेकर अशी घेण्यात यावी. सातबारा सदरी वाटपानुसार नोंदी घेताना शेतीच्या स्थानिक नावाचा उल्लेख करुन घेणेचा आहे.

५. वाटप तक्त्यामध्ये वाटपापुर्वी असलेल्या खाते नंबरचा आणी धारकांचा उल्लेख केलेला आहे. त्यामुळे नवीन धारकांना देण्यात आलेले क्षेत्र हे केवळ नमुद खाते नंबरमधुनच देण्यात आलेले आहे तसेच प्रत्येक दावा

मिळकतीचे वाटपाचे एकुण क्षेत्र हे दाव्यामध्ये नमुद केलेले आहे आणी त्या क्षेत्रापैकी वादी आणी प्रतिवादी यांना वाटपामध्ये क्षेत्र देण्यात आलेले आहे.

६. प्रतिवादी नंबर ७ यांनी वाद मिळकतीमधील त्यांचा असणारा संपुर्ण हिस्सा हा अनुक्रमे प्रतिवादी नंबर १ ते ६ यांचे लाभामध्ये विनामोबदला, स्वखुशीने कायमस्वरुपी सोडुन दिलेला आहे.

७. वादी व प्रतिवादी यांनी वाटपामध्ये आलेल्या क्षेत्राच्या चतुसिमा दर्शविण्याकामी तडजोडीसोबत परिशिष्ठ अ नुसार, पान नंबर १ ते ११ अन्वये कच्चा नकाशा सादर केलेला आहे. त्यामधील सर्व मजकुर बरोबर असुन तो याच तडजोडीचा भाग समजण्यात यावा.

८. वरीलप्रमाणे वादी आणी प्रतिवादी यांनी तडजोडीने अंतिमरित्या वाटप करुन घेतले असुन त्यानुसार आज रोजी मे. न्यायालयात तडजोड पुरशीस सादर केलेली आहे. वादी आणी प्रतिवादी हे मान्य व कबुल करितात की त्यांचेमध्ये शेतमिळकतीच्या वाटपाबाबत कोणताही वाद शिल्लक राहिलेला नाही. सदरच्या तडजोडीनुसार झालेले वाटप हे सर्वांना मान्य व कबुल असुन त्यांचे वालीवारस यांचेवर देखील बंधनकारक राहील. सदरचे वाटप अथवा तडजोडी विरुदध भविष्यामध्ये कोणालाही कोणत्याही दिवाणी अथवा महसुली तसेच फौजदारी न्यायालयामध्ये अर्ज, दावा, अपिल दाखल करता येणार नाही हे सर्वांना मान्य व कबुल आहे.

९. याप्रमाणे वादी आणी प्रतिवादी यांनी, स्वखुशीने, आत्मसंतोषाने, कोणत्याही मानसिक, शारिरिक अथवा आर्थिक दबावाखाली न येता, मनाच्या आणी शरीराच्या अंत्यंत चांगल्या अवस्थेमध्ये असताना सदरची तडजोड पुरशीस

लिहुन दिली त्याचे वाचुन पाहुन खात्री करुन त्यानंतर त्यावर सहया अंगठे दिलेले आहेत.

याप्रमाणे तडजोड पुरशीस असुन त्यानुसार तडजोड हुकुमनामा होणेस विनंती आहे.


**याप्रमाणे तडजोड हुकुमनामा असे.**

CIVIL JU

# Plot Report

(१७)

Rural, District : पुणे, Taluka : बारामती, Village : साबळेवाडी,




Survey No. : 1/1
Total Area : 0.5800
Pot kharaba : 0.0000
Owner Name : सुनिल सर्जेराव साबळे
Khata No. : 1506

--------------------------------

Survey No. : 1/1
Total Area : 0.0200
Pot kharaba : 0.0000
Owner Name : ग्राम पंचायत साबळेवाडी
Khata No. : 1652

--------------------------------

Survey No. : 1/1
Total Area : 1.0800
Pot kharaba : 0.0000
Owner Name : सविता सतिश साबळे
Khata No. : 1811

परिशिष्ट - अ


पान नं. १ ते ११.

CIVIL JUDGE OF

# Plot Report

(११७)

Rural, District : पुणे, Taluka : बारामती, Village : साबळेवाडी,




Survey No. : 382
Total Area : 0.3900
Pot kharaba : 0.0200
Owner Name : लता लालासो गाडेकर
Khata No. : 1423

--------------------------------

Survey No. : 382
Total Area : 0.7600
Pot kharaba : 0.0400
Owner Name : राहुल पोपट गाडेकर
Khata No. : 1670

--------------------------------


Survey No. : 382
Total Area : 0.3800
Pot kharaba : 0.0200
Owner Name : लालासो किसन गाडेकर
Khata No. : 1936

CIVIL JUDGE

# Plot Report

(९०)

Rural, District : पुणे, Taluka : बारामती, Village : साबळेवाडी,




Survey No. : 368
Total Area : 0.1900
Pot kharaba : 0.0125
Owner Name : लता लालासो गाडेकर
Khata No. : 1423

--------------------------------

Survey No. : 368
Total Area : 0.7600
Pot kharaba : 0.0500
Owner Name : ताराबाई विठ्ठल गाडेकर
Khata No. : 156


--------------------------------

Survey No. : 368
Total Area : 0.3800
Pot kharaba : 0.0250
Owner Name : मिलिंद पोपट गाडेकर
Khata No. : 1669

CIVIL JUDGE OF
KH

# Plot Report

Rural, District : पुणे, Taluka : बारामती, Village : साबळेवाडी,




Survey No. : 191
Total Area : 0.0450
Pot kharaba : 0.0100
Owner Name : लालासो किसन गाडेकर
Khata No. : 1296

--------------------------------

Survey No. : 191
Total Area : 0.0900
Pot kharaba : 0.0100
Owner Name : ताराबाई विठ्ठल गाडेकर
Khata No. : 156


--------------------------------

Survey No. : 191
Total Area : 0.0500
Pot kharaba : 0.0100
Owner Name : कुसुम तुळशीराम गाडेकर, शारदा अशोक चव्हाण, दिलीप तुळशीराम गाडेकर, शंकुतला कृष्णा जाधव, उत्तम तुळशीराम गाडेकर
Khata No. : 166

CIVIL JUDGE

# Plot Report

Rural, District : पुणे, Taluka : बारामती, Village : साबळेवाडी,




Survey No. : 189
Total Area : 0.1400
Pot kharaba : 0.0200
Owner Name : ताराबाई विठ्ठल गाडेकर
Khata No. : 156

--------------------------------

Survey No. : 189
Total Area : 0.0700
Pot kharaba : 0.0100
Owner Name : लालासो किसन गाडेकर
Khata No. : 1936

--------------------------------

Survey No. : 189
Total Area : 0.0700
Pot kharaba : 0.0100
Owner Name : पोपट किसन गाडेकर
Khata No. : 300


CIVIL JUDGE

# Plot Report

(७)

Rural, District : पुणे, Taluka : बारामती, Village : साबळेवाडी,

N




Survey No. : 179
Total Area : 0.1300
Pot kharaba : 0.0400
Owner Name : तात्या नारायण गाडेकर
Khata No. : 1491

--------------------------------

Survey No. : 179
Total Area : 0.0500
Pot kharaba : 0.0150
Owner Name : अरुणा पांडुरंग घाडगे, राजेंद्र विठ्ठल गाडेकर, ताराबाई विठ्ठल गाडेकर, संजय विठ्ठल गाडेकर, प्रदिप विठ्ठल गाडेकर, दिलीप विठ्ठल गाडेकर
Khata No. : 1493

--------------------------------


Survey No. : 179
Total Area : 0.0950
Pot kharaba : 0.0300
Owner Name : ज्ञानदेव बाबुराव गाडेकर

CIVIL JU GE

# Plot Report

(६)

Rural, District : पुणे, Taluka : बारामती, Village : साबळेवाडी,




Survey No. : 178
Total Area : 0.1800
Pot kharaba : 0.0100
Owner Name : ताराबाई विठ्ठल गाडेकर
Khata No. : 156

--------------------------------

Survey No. : 178
Total Area : 0.1000
Pot kharaba : 0.0050
Owner Name : लालासो किसन गाडेकर
Khata No. : 1936


--------------------------------

Survey No. : 178
Total Area : 0.0900
Pot kharaba : 0.0050
Owner Name : पोपट किसन गाडेकर
Khata No. : 300

CIVIL JUDGE C

# Plot Report

Rural, District : पुणे, Taluka : बारामती, Village : साबळेवाडी,




Survey No. : 175
Total Area : 0.0225
Pot kharaba : 0.0000
Owner Name : तात्या नारायण गाडेकर
Khata No. : 1491

-------------------------------

Survey No. : 175
Total Area : 0.0100
Pot kharaba : 0.0000
Owner Name : प्रदिप विठ्ठल गाडेकर, अरुणा पांडुरंग घाडगे, दिलीप विठ्ठल गाडेकर, ताराबाई विठ्ठल गाडेकर, संजय विठ्ठल गाडेकर, राजेंद्र विठ्ठल गाडेकर
Khata No. : 1493

-------------------------------

Survey No. : 175
Total Area : 0.0150
Pot kharaba : 0.0000
Owner Name : ज्ञानदेव बाबुराव गाडेकर


CIVIL JUDGE OF

# Plot Report

(8)

Rural, District : पुणे, Taluka : बारामती, Village : साबळेवाडी,

N




KHANDALA

Survey No. : 174
Total Area : 0.2550
Pot kharaba : 0.0700
Owner Name : लता लालासो गाडेकर
Khata No. : 1423

--------------------------------

Survey No. : 174
Total Area : 0.1900
Pot kharaba : 0.0500
Owner Name : सुरेश आप्पा गाडेकर
Khata No. : 1619

--------------------------------

Survey No. : 174
Total Area : 0.6700
Pot kharaba : 0.1700
Owner Name : अतुल मोहन गाडेकर
Khata No. : 1923


CIVIL JUDGE OF

# Plot Report

(3)

Rural, District : पुणे, Taluka : बारामती, Village : साबळेवाडी,

N




Survey No. : 173
Total Area : 0.3300
Pot kharaba : 0.0700
Owner Name : संदिप प्रकाश गाडेकर
Khata No. : 1719

--------------------------------

Survey No. : 173
Total Area : 0.3300
Pot kharaba : 0.0700
Owner Name : अजित प्रकाश गाडेकर
Khata No. : 1720

--------------------------------


Survey No. : 173
Total Area : 0.1000
Pot kharaba : 0.0000
Owner Name : आदित्य सुरेश गाडेकर
Khata No. : 2136

CIVIL JUDGE OF

# Plot Report

(२)

Rural, District : पुणे, Taluka : बारामती, Village : साबळेवाडी,




Survey No. : 14
Total Area : 0.5300
Pot kharaba : 0.0000
Owner Name : लता लालासो गाडेकर
Khata No. : 1423

--------------------------------

Survey No. : 14
Total Area : 0.8000
Pot kharaba : 0.0000
Owner Name : सौरभ संजय गाडेकर
Khata No. : 1668

--------------------------------

Survey No. : 14
Total Area : 0.5200
Pot kharaba : 0.0000
Owner Name : मिलिंद पोपट गाडेकर
Khata No. : 1669

CIVIL JUDGE OF

# खर्चाचे टिपण

**रे.दि.मु.नं. ४७/२०२६** **नि. १५ लगत**

| वादी | | | प्र.वादी | | |
|---|---|---|---|---|---|
| वादीस झालेला | रूपये | पैसे | प्र.वादीस झालेला | रूपये | पैसे |
| अर्जास स्टँम्प | ४०० | ०० | विरूध्द अर्जास स्टँम्प | ०० | ०० |
| वकीलपत्रास स्टँम्प | १० | ०० | वकीलपत्र स्टँम्प | १० | ०० |
| दाखल कागद | ६० | ०० | दाखल कागद | ०० | ०० |
| दाखल अर्ज़ | २० | ०० | दाखल अर्ज | ०० | ०० |
| वकील फी | ९० | ०० | वकील फी | ९० | ०० |
| प्रोसेस | ०० | ०० | प्रोसेस | ०० | ०० |
| कमिशन फी | ०० | ०० | कमिशन फी | ०० | ०० |
| **एकूण** | **५८०** | **००** | **एकूण** | **१००** | **००** |
| **न दिलेला खर्च** | | | **न दिलेला खर्च** | | |
| कोर्ट फी परतावा | ०० | ०० | कोर्ट फी परतावा | ०० | ०० |
| दाखल कागद | ६० | ०० | दाखल कागद | ०० | ०० |
| **बाकी** | **५२०** | **००** | **बाकी** | **१००** | **००** |

आज दिनांक ०७ एप्रिल सन २०२६ रोजी आमच्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

व.लिपिक

CIVIL JUDGE OF KHANDALA
KHANDALA

(एस.जी.कुवळेकर)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर खंडाळा

वादी तर्फे वकील **एन.डी.पिसाळ**

प्र.वादी तर्फे वकील **एम.एस.राउत**

हया मुकदम्यातील पक्षकारांना अशी ताकीद देण्यात येते की, त्यांनी हजर केलेले कोणतेही दस्तऐवज जर ते परत नेले नसतील तर अपील झाले असल्यास अपीलाचा निकाल झाल्यावर नाश करून टाकण्यास पात्र होतील.